अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल) कार्या.
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- अतिमआ(ज)/उआ(सा.प्र.)/ 2८५६
दिनांक :- २९/०६/२०१८

## कार्यालयीन आदेश

**विषय :-** पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील '' बिगारी ''सेविकेच्या वारसाचे घाणभत्ता वारस प्रकरण सादर करणेबाबत.

**संदर्भ :-** आज्ञापत्र जा.क्र.अतिरिक्त (ज)/उआ(साप्र)/१३५१,दि.११/०५/२०१८

पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पुरुष प्रधान हुद्याच्या सफाईसेवकांच्या निधनानंतर त्यांच्या वारस पत्नी यांना वारस हक्काने तत्कालीन धोरणानुसार बिगर घाणभत्त्याच्या जागी नियुक्ती देण्यात आली होती. संबंधित सेविकांनी केलेल्या मागणीनुसार सदर बिगारी सेविकांना घाणभत्ता लागू असलेल्या पदांवर नियुक्ती करणे व त्यांना घाणभत्ता लागू करणेबाबत संदर्भांकित कार्यालयीन आदेश प्रस्तृत करण्यात आले आहे.

संदर्भांकित आदेशातील अ.क्र.१ वरील श्रीमती लक्ष्मीबाई नारायण करडे हया दि.३१/१२/२०१६ रोजी सेवेतून सेवानिवृत्त झाल्या असल्याने त्यांची बदली रद्द समजण्यात यावी.

श्रीमती लक्ष्मीबाई नारायण करडे या सेविका मान्यतेच्या दिनांकापूर्वी दि.३१/१२/२०१६ रोजी वयोपरत्वे सेवानिवृत्त झाल्या आहेत. सदर सेविकेचे नाव प्रस्तावामध्ये समाविष्ट असल्याने व मान्यतेच्या दिनांकापूर्वी संबंधित सेविका सेवानिवृत्त झाल्या असल्याने, त्यांचे ऐवजी त्यांच्या एका पात्र वारसास नियुक्तीचा लाभ देणे आवश्यक आहे.

संबंधित सेविकेच्या एका पात्र वारसास मा. लाड / पागे कमिटीच्या शिफारशीनुसार नियुक्ती देणे शक्य आहे.

तरी, श्रीमती लक्ष्मीबाई नारायण करडे - बिगारी ह्या उद्यान कार्यालयाकडे कार्यरत होत्या.त्यामुळे सदर सेविकेच्या वारसांची मा. लाड / पागे कमिटीच्या शिफारशीनुसार व घाणभत्ता वारस हक्काने नियुक्ती द्यावयाचे प्रकरण संबंधित कार्यालयाने तयार करुन आस्थापना विभागाकडे पुढील कार्यवाहीस्तव सादर करणेबाबतची दक्षता घ्यावी.

कळावे.

19.06.18
**(शीतल तेली-उगले)**
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल)**
**पुणे महानगरपालिका**

**प्रत :-** संबंधित मा. खातेप्रमुख/प्रशासन अधिकारी,
पुणे महानगरपालिका
यांजकडे माहिती व पुढील तजविजीसाठी रवाना.

**(अनिल मुळे)**
**उप आयुक्त (सामान्य प्रशासन)**
**पुणे महानगरपालिका**